## कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**बातमी क्र.१**

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी-हिंदी दिवस/२०१९ दिनांक १८ सप्टेंबर, २०१९

जळगाव दि.१६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास आणि संशोधन प्रशाळेत सोमवार, दि.१६ सप्टेंबर रोजी हिंदी दिवस साजरा करण्यात आला. प्रशाळेतील विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान, हिंदी काव्यवाचन आणि गीत गायनाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी डॉ.हरिसिंग गौर, केंद्रीय विद्यापीठ,सागर (मध्यप्रदेश) येथील हिंदी व संस्कृत विभागाचे प्रमुख प्रो.आनंद प्रकाश त्रिपाठी ह्यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.म.सु.पगारे होते. कार्यक्रमास हिंदी विषयाचे प्रसिध्द साहित्यकार डॉ.सुभाष महाले,प्रा.सुनील अहिरे, प्रा.प्रिती सोनी,प्रा.नेत्रा उपाध्ये, प्रा.संधानशीव,प्रा.तुषार सोनवणे, प्रा.भालेराव हे उपस्थित होते.

यावेळी प्रो.आनंद त्रिपाठी यांनी स्वातंत्र्यकाळात हिंदी भाषेनी संपुर्ण भारताला एकतेच्या सूत्रामध्ये बांधून ठेवले होते. स्वातंत्र्यानंतर राष्ट्रभाषा म्हणून आपण तीला जो सम्मान देणे गरजेचे होते तो राजकीय विरोधामुळे देऊ शकलो नाही. मात्र हिंदी भाषेनी स्वातंत्रोत्तर काळात जी प्रगती केली ती कौतुकास्पद अशी आहे. आज चित्रपट, मासिक, इंटरनेट, फेसबुक, इंस्टाग्राम या माध्यमातून हिंदी सर्व विश्वाला गवसनी घालू पाहत आहे. आज १६० हून अधिक देशात हिंदी बोलली जाते. १२२ देशांच्या विविध विद्यापीठांमध्ये हिंदी भाषेचे विधिवत शिक्षण दिले जाते. अध्यक्षीय समारोपात डॉ.पगारे यांनी सांगितले की,हिंदी भाषेत प्रचंड क्षमता असून देशाच्या विविध राज्यांनी तिचा स्वीकार केला आहे.यावेळी आयोजित हिंदी काव्यवाचन व गीत गायनामध्ये हिंदी, मराठी व इंग्रजी विषयाच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून आपल्या स्वरचित काव्यांसह हिरवंशराय बच्चन, गिरजाकुमार माथुर, सुभद्राकुमारी चौहान, महादेवी वर्मा यांच्या कविता सादर केल्या.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन दीपक दुडके यांनी तर अभार प्रदर्शन लालसिंग वसावे या विद्यार्थ्यांनी केले.

---

**बातमी क्र.१**

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/बातमी/हस्तदेय/२०१९ दि.१८ सप्टेंबर,२०१९

जळगाव दि.१७ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेत ओझोन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन सोमवार, दि.१६ सप्टेंबर रोजी करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.एस.आर.थोरात होते. जीवशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.ए.जी. इंगळे, पर्यावरण शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.एस.टी.इंगळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ.एस.बी.अत्तरदे यांनी संकल्पना विशद केली. प्रा. ए.जी. इंगळे यांनी ओझोन दिवस हा एक दिवसाचा कार्यक्रम घेऊन साजरा न करता कायमस्वरुपी पर्यावरण संवर्धन व रक्षणाची जबाबदारी घेण्याचे आवाहन केले. प्रा.एस.टी.इंगळे यांनी ओझोनच्या समस्येबाबत लोकांमध्ये व्यापक जनजागृती करण्याची आज गरज असल्याचे सांगीतले. प्रा.एस.आर.थोरात यांनी आपल्या रोजच्या आचरणातून ओझोनथर क्षय थांबविण्यासाठी शक्य ते प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

यावेळी दुपारच्या सत्रात परिसंवाद व सादरीकरण स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. परिसंवाद स्पर्धेत केतन सुर्यवंशी यास प्रथम तर महेश कचरे यास द्वितीय बक्षीस मिळाले. भित्तीपत्रक स्पर्धेत गीता पाटील हीस प्रथम तर भारती डब्बे व मानसी कोल्हे यांना द्वितीय बक्षीस मिळाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सौ. मयुरी पाटील यांनी केले तर आभार डॉ.एम.टी.गोडबोले यांनी मानले.

---

**बातमी क्र.३**

जा.क्र.कबचौउमवि/१६/पदवीप्रदान-बातमी/हस्तदेय/२०१९ दि. १८ सप्टेंबर,२०१९

जळगाव दि.१८ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या २८ व्या दीक्षांत समारंभात विद्यार्थ्यांना पदवी/पदवीका प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी विलंबशुल्कासह ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत दि.३१ सप्टेंबर पर्यंत वाढविण्यात आली आहे.

विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व अद्यापपावेतो ज्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज सादर केलेले नसतील त्यांनी दि.३० सप्टेंबर पर्यंत अर्ज सादर करावेत असे आवाहन संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केल असून विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Home Page वरील Student Corner- Examination- Convocation वर दि.३० सप्टेंबर पर्यंत विलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरता येतील.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/हस्तदेय/२०१९ दि. १८ सप्टेंबर,२०१९

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातम्यांना आपल्या दैनिकात जळगाव, धुळे व नंदूरबार आवृत्तीत प्रसिद्ध करावी,ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी